

मुंबई : एमएमआरसीतर्फे कामगारांना स्वच्छतेचे धडे देण्यात आले.

# एमएमआरसीतर्फे कामगारांना स्वच्छतेचे धडे

मुंबई : मुंबईतील मेट्रो- ३ या प्रकल्पस्थळी काम करणाऱ्या एकूण ९ हजार ७५० कामगारांना एमएमआरसीने स्वच्छतेचे धडे दिले. या कामगारांना सामाजिक अंतर (सोशल डिस्टन्सिंग) म्हणजे काय, त्याचे फायदे काय, स्वच्छता कशी राखावी, आदी गोष्टींबाबत सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. या सर्व कामगारांच्या आरोग्याच्या दृष्टीने सर्वतोपरी काळजी प्रशासनाकडून घेतली जात आहे. कोरोनाचा प्रादुर्भाव होण्याची भीती लक्षात घेऊन मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनने (एमएमआरसी) आपल्या ५१ ठिकाणी ९,७५० कामगारांची राहण्याची सोय केली आहे. एमएमआरडीएचे आयुक्त आर. ए. राजीव यांनी व्हिडीओ कॉन्फरन्सिंगद्वारे सर्व विभागांच्या मुख्य अधिकाऱ्यांची बैठक घेऊन मजुरांसाठी आवश्यक ती सर्व व्यवस्था करण्याचे आदेश दिले. त्यानुसार मेट्रो- ३ च्या भूमिगत प्रकल्पांची कामे करणाऱ्या कामगारांना कोरोनापासून संरक्षणाचे धडे दिले जात आहे.